भारत सरकार

विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# काळ्या बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८०

**(सन १९८० चा अधिनियम क्रमांक ७)**

[दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान]

# The Prevention of Black Marketing and Maintenance of Supplies of Essential Commodities Act, 1980

**(Act No. 7 of 1980)**

**[ As in force on the 1st December, 1999]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

[ किंमत : रु. ४.०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान असलेला दि प्रिव्हेंशन ऑफ ब्लॅक मार्केटिंग अँड मेंटेनन्स ऑफ सप्लायीज ऑफ इसेन्शिअल कमोडीटीज ॲक्ट, १९८० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ११, अंक १, दिनांक २२ जून, २००० यात पृष्ठ ३७ ते ४० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून, २०००.

**डॉ. सुभाष चंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार,

## PREFACE

This edtion of the The Prevention of Black Marketing and Maintenance of Supplies of Essential Commodities Act, 1980 as on the 1st December, 1999 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part-XII, Section-1, No. 1, Volume 11, dated 22nd June, 2000 on pages 37 to 40.

This authoritative text was published under the authority of the President under Section-2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

Dr. SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

New Delhi,
Dated 22nd June, 2000.

एच ४००१—१(१०३५—१-२००४)

# काळचा बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८०

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्याची शक्ती.
४. स्थानबद्धता आदेशांची अंमलबजावणी.
५. स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याची शक्ती.
६. विवक्षित कारणांवरून स्थानबद्धता आदेश विधिबाह्य किंवा अप्रवर्ती न होणे.
७. फरारी व्यक्तींच्या संबंधातील शक्ती.
८. आदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तीला स्थानबद्धता आदेशाची कारणे उघड करणे.
९. सल्लागार मंडळाची घटना.
१०. सल्लागार मंडळाकडे निर्देशन.
११. सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.
१२. सल्लागार मंडळाच्या अहवालावरील कार्यवाही.
१३. स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.
१४. स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करणे.
१५. स्थानबद्ध केलेल्या व्यक्तींची तात्पुरती मुक्तता.
१६. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.
१७. निरसन व व्यावृत्ती.

# काळ्या बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८०
(१९८० चा अधिनियम क्रमांक ७)

(१ डिसेंबर, १९९९ रोजी यथाविद्यमान)

[१२ फेब्रुवारी, १९८०]

**काळ्या बाजारास प्रतिबंध करणे आणि समाजास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा चालू ठेवणे या प्रयोजनासाठी आणि तत्संबंधित विवक्षित प्रकरणी स्थानबद्धतेच्या बाबींसाठी उपबंध करण्याकरिता अधिनियम :—**

भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, "काळ्या बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अधिनियम, १९८० ", असे म्हणावे.

(२) जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.

(३) ५ ऑक्टोबर, १९७९ रोजी तो अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "समुचित शासन" याचा अर्थ, केंद्र सरकारकडून किंवा केंद्र सरकारच्या एखाद्या अधिकाऱ्याकडून देण्यात आलेल्या स्थानबद्धता आदेशाच्या बाबतीत किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत, केंद्र सरकार, आणि एखाद्या राज्य शासनाकडून किंवा एखाद्या राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याकडून देण्यात आलेल्या स्थानबद्धता आदेशाच्या बाबतीत किंवा अशा आदेशान्वये स्थानबद्ध करण्यात आलेल्या व्यक्तीच्या बाबतीत ते राज्य शासन, असा आहे ;

(ख) "स्थानबद्धता आदेश" याचा अर्थ, कलम ३ अन्वये दिलेला आदेश, असा आहे ;

(ग) "राज्य शासन" याचा, एखाद्या संघराज्य क्षेत्राच्या संबंधातील अर्थ, त्याचा प्रशासक, असा आहे.

विवक्षित व्यक्तींना स्थानबद्ध करण्याचा आदेश देण्याची शक्ती.

३. (१) केंद्र सरकार किंवा एखादे राज्य शासन किंवा केंद्र सरकारच्या सहसचिवाच्या दर्जाहून ज्याचा दर्जा कमी नसेल व ज्यास या कलमाच्या प्रयोजनार्थ, त्या शासनाकडून विशेषरीत्या शक्ती प्रदान करण्यात आली असेल असा त्या शासनाचा कोणताही अधिकारी, अथवा एखाद्या राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जाहून ज्याचा दर्जा कमी नसेल व ज्यास या कलमाच्या प्रयोजनार्थ, त्या शासनाकडून विशेषरीत्या शक्ती प्रदान करण्यात आली असेल असा त्या शासनाचा कोणताही अधिकारी, जर त्याची कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशी खात्री पटली असेल की, समाजाला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा चालू ठेवण्यास कोणत्याही रीतीने बाधक होईल असे कृत्य करण्यास तिला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे तर, अशा व्यक्तीला स्थानबद्ध करण्याचे निदेश देणारा आदेश देऊ शकेल.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, "समाजाला अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा राखण्यास कोणत्याही रीतीने बाधक होईल असे कृत्य करणे" याचा अर्थ,—

(क) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ (१९५५ चा १०) अन्वये किंवा समाजाला अत्यावश्यक असलेल्या कोणत्याही वस्तूचे उत्पादन, पुरवठा किंवा वितरण यांचे नियंत्रण अथवा व्यापार व वाणिज्य यांच्या संबंधात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये शिक्षापात्र असणारा कोणताही गुन्हा करणे किंवा तो करण्यास कोणत्याही व्यक्तीला चिथवणे; किंवा

(ख) जी कोणतीही वस्तू,—

(एक) अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ यामध्ये दिलेल्या व्याख्येनुसार अत्यावश्यक वस्तू असेल ; किंवा

(दोन) जिच्या संबंधात खंड (क) मध्ये निर्देशिलेल्या अशा अन्य कोणत्याही कायद्यात उपबंध करण्यात आलेले असतील,

ती वस्तू त्या अधिनियमाचे किंवा पूर्वोक्त अशा अन्य कायद्याचे उपबंध ज्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विफल होतील किंवा विफल होण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही रीतीने, लाभ प्राप्त करण्याच्या दृष्टीने हाताळली जाणे ;

(२) खालील अधिकाऱ्यांपैकी कोणासही म्हणजे—

(क) जिल्हा दंडाधिकाऱ्यास ;

(ख) जेथे पोलीस आयुक्तांची नियुक्ती झाली असेल तेथे त्या पोलीस आयुक्तास,

पोटकलम (१) मध्ये उपबंधित केल्यानुसार त्यांची खात्री पटली असल्यास, उक्त पोटकलमान्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करता येईल.

(३) जेव्हा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या एखाद्या अधिकाऱ्याकडून या कलमान्वये कोणताही आदेश देण्यात येईल तेव्हा, तो ज्या राज्य शासनाच्या अधीनस्थ असेल त्याला, ज्या कारणांमुळे आदेश देण्यात आला असेल, ती कारणे आणि त्याच्यामते त्या विषयाशी ज्याचा संबंध आहे असा अन्य तपशील

यांसह ती वस्तुस्थिती तात्काळ कळवील आणि असा कोणताही आदेश, तो दिल्यानंतर बारा दिवसांपेक्षा अधिक काळ, तो त्या राज्य शासनाकडून त्या दरम्यान मान्य करण्यात आला असल्याखेरीज, अंमलात राहणार नाही:

परंतु, असे की, ज्यावेळी कलम (८) अन्वये, आदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्याने स्थानबद्धतेची कारणे पाच दिवसानंतर, परंतु स्थानबद्धतेच्या दिनांकापासून दहा दिवसांपेक्षा उशिरा नाही एवढ्या कालांतराने कळविली असतील त्यावेळी या पोटकलमाअन्वये "बारा दिवस" या शब्दांऐवजी "पंधरा दिवस" हे शब्द आपरिवर्तनाच्या अधीनतेने लागू होतील.

(४) जेव्हा राज्य शासनाने या कलमान्वये कोणताही आदेश दिला किंवा मान्य केला असेल अथवा राज्य शासनाच्या सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या व पोटकलम (१) अन्वये विशेषरीत्या शक्ती प्रदान करण्यात आलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने या कलमान्वये कोणताही आदेश दिला असेल तेव्हा, राज्य शासन, आदेश ज्या कारणावरून दिला असेल ती कारणे आणि राज्य शासनाच्या मते आदेश देण्याच्या आवश्यकतेशी ज्यांचा संबंध आहे असा अन्य तपशील यांसह ती वस्तुस्थिती केंद्र सरकारला सात दिवसांच्या आत कळवील.

स्थानबद्धता आदेशांची अंमल-बजावणी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) अन्वये अटकेच्या वॉरंटाच्या अंमल-बजावणीसाठी उपबंधित केलेल्या रीतीने, स्थानबद्धता आदेशाची अंमलबजावणी भारतातील कोणत्याही ठिकाणी करता येईल.

स्थानबद्धतेचे ठिकाण व शर्ती विनियमित करण्याची शक्ती.

५. जिच्यासंबंधात एखादा स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशी प्रत्येक व्यक्ती,—

(क) समुचित शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ठिकाणी व अशा शर्तीनुसार, तसेच निर्वाह शिस्त व शिस्तभंगाबद्दलची शिक्षा यासंबंधीच्या शर्तीसह, स्थान-बद्ध केली जाण्यास पात्र असेल; आणि

(ख) समुचित शासनाच्या आदेशाद्वारे, स्थानबद्धतेच्या एका ठिकाणाहून स्थानबद्धतेच्या दुसऱ्या ठिकाणी मग ते त्याच राज्यातील असो वा अन्य राज्यातील असो-हलविली जाण्यास पात्र असेल :

परंतु, एखाद्या व्यक्तीला एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलविण्यासाठी, त्या दुसऱ्या राज्याच्या संमतीशिवाय राज्य शासनाकडून खंड (ख) अन्वये कोणताही आदेश दिला जाणार नाही.

विवक्षित कारणांवरून स्थानबद्धता आदेश विधिबाह्य किंवा अप्रवर्ती न होणे.

६. कोणताही स्थानबद्धता आदेश हा, केवळ खालील कारणांमुळे विधिबाह्य किंवा अप्रवर्ती होणार नाही,—

(क) त्या अन्वये स्थानबद्ध केली जावयाची व्यक्ती ही, आदेश देणारे शासन किंवा अधि-कारी यांच्या क्षेत्रीय अधिकारितेच्या सीमाबाहेरील आहे ; किंवा

(ख) अशा व्यक्तीच्या स्थानबद्धतेचे ठिकाण उक्त सीमांबाहेर आहे.

फरारी व्यक्तींच्या संबंधातील शक्ती.

७. (१) जिच्या संबंधात एखादा स्थानबद्धता आदेश देण्यात आलेला आहे ती व्यक्ती फरार झाली आहे किंवा आदेशाची अंमलबजावणी यथास्थिति करणे शक्य होणार नाही अशा रीतीने ती लपून बसली आहे, असे समजण्यास [1][समुचित शासनाला किंवा] कलम ३, पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अधिकाऱ्याला] कारण असेल तर, ते शासन, [2][किंवा तो अधिकारी,]—

(क) उक्त व्यक्ती साधारणत: जेथे राहत असेल अशा ठिकाणी अधिकारिता असलेला महानगर दंडाधिकारी किंवा प्रथमवर्ग दंडाधिकारी यास ती वस्तुस्थिती लेखी कळवू शकेल; आणि त्यानंतर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याची कलमे ८२, ८३, ८४ व ८५ यांचे उपबंध, त्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात यावे असे निदेशित करणारा आदेश म्हणजे जणू काही त्या दंडाधिकाऱ्याने काढलेले वॉरंटच असावे त्याप्रमाणे, उक्त व्यक्ती व तिची संपत्ती यासंबंधात लागू होतील;

(ख) **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेल्या आदेशाद्वारे, उक्त व्यक्तीला त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा कालावधीच्या आत, अशा अधिकाऱ्यासमोर हजर राहण्याचे निदेशित करू शकेल, आणि जर उक्त व्यक्तीने अशा निदेशाचे अनुपालन करण्यात कसूर केली तर, आपल्याला त्या निदेशाचे अनुपालन करणे शक्य नव्हते, असे तिने सिद्ध केल्याखेरीज, आणि आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याला ज्यामुळे अनुपालन करणे अशक्य झाले असेल ते कारण, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत कळविल्याखेरीज, त्या व्यक्तीला एक वर्षापर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) च्या खंड (ख) खालील प्रत्येक अपराध दखलपात्र असेल.

---

१. १९८२ चा अधिनियम २७, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले.
२. वरील अधिनियमाच्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला.

८. जेव्हा एखाद्या स्थानबद्धता आदेशानुसार एखाद्या व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात येईल तेव्हा, आदेश देणारा प्राधिकारी, स्थानबद्धतेच्या दिनांकापासून होईल तितक्या लवकर, परंतु साधारणतः पाच दिवसांपेक्षा उशीरा नाही, आणि अपवादात्मक परिस्थितीत व लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी दहा दिवसांपेक्षा उशीरा नाही एवढ्या कालांतराने त्या व्यक्तीला, आदेश ज्या कारणांवरून देण्यात आला असेल ती कळवील आणि समुचित शासनाकडे त्या आदेशाविरूद्ध अभिवेदन देण्याची संधी तिला लवकरात लवकर उपलब्ध करून देईल.

आदेशाचा परिणाम होणाऱ्या व्यक्तीला स्थानबद्धता आदेशाची कारणे उघड करणे.

(२) प्राधिकाऱ्याला जी तथ्ये उघड करणे लोकहिताविरुद्ध आहे असे वाटत असेल ती उघड करण्यास, पोटकलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे त्यास फर्मावण्यात येणार नाही.

९. (१) केंद्र सरकार आणि प्रत्येक राज्य शासन, आवश्यक असेल तेव्हा, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, एक किंवा अधिक सल्लागार मंडळे घटित करील.

सल्लागार मंडळाची घटना.

[१][(२) अशा प्रत्येक मंडळात अशा तीन व्यक्ती असतील की, ज्या एखाद्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्त केल्या जाण्यास अर्हताप्राप्त आहेत किंवा होत्या आणि अशा व्यक्ती समुचित शासनाकडून नियुक्त केल्या जातील.

(३) समुचित शासन सल्लागार मंडळाच्या सदस्यांपैकी जो एखाद्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होता अशा एका सदस्याची मंडळाचा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करील आणि एखाद्या संघ राज्यक्षेत्राच्या बाबतीत, एखाद्या राज्याच्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश असलेल्या कोणत्याही व्यक्तीची सल्लागार मंडळावरील नियुक्ती ही, संबंधित राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने केलेली असेल.]

१०. या अधिनियमात अन्यथा व्यक्तपणे उपबंधित केले असेल त्याखेरीज, या अधिनियमाखाली स्थानबद्धता आदेश देण्यात आला असेल अशा प्रत्येक प्रकरणी, समुचित शासन, त्या आदेशान्वये केलेल्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून तीन आठवड्यांच्या आत, आदेश ज्या कारणांवरून देण्यात आला ती कारणे आणि आदेशामुळे ज्या व्यक्तीवर परिणाम झाला असेल त्या व्यक्तीचे कोणतेही अभिवेदन असल्यास, ते अभिवेदन आणि कलम ३ पोटकलम (२) मध्ये उल्लेखलेल्या एखाद्या अधिकाऱ्याने आदेश दिला असल्यास, त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये अशा अधिकाऱ्याने दिलेला अहवाल समुचित शासनाने कलम ९ अन्वये घटित केलेल्या सल्लागार मंडळापुढे ठेवील.

सल्लागार मंडळाकडे निर्देशन.

**[कलम १० खाली केलेल्या आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी कोणत्याही सल्लागार मंडळापुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही निर्देशावर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरीही, त्या मंडळाकडून, जणूकाही हा अधिनियम अधिनियमित झाला नसल्याप्रमाणे अशा प्रारंभानंतरही कार्यवाही करणे चालू ठेवले जाऊ शकेल.]

**[कलम१० खालील प्रलंबित निर्देशां-संबंधातील व्यावृत्ती.]

११. (१) सल्लागार मंडळ, त्याच्यापुढे ठेवलेली कागदपत्रे विचारात घेतल्यानंतर आणि त्याला आवश्यक वाटेल अशी आणखी माहिती समुचित शासनाकडून किंवा त्या प्रयोजनासाठी समुचित शासना-मार्फत बोलाविलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संबंधित व्यक्तीकडून मागविल्यानंतर आणि जर कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, त्याला तसे करणे अत्यावश्यक वाटल्यास किंवा संबंधित व्यक्तीने सुनावणीची इच्छा दर्शविली असल्यास, तिचे म्हणणे व्यक्तिशः ऐकून घेतल्यानंतर, संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेच्या दिनांकापासून सात आठवड्यांच्या आत समुचित शासनाला आपला अहवाल सादर करील.

सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.

(२) सल्लागार मंडळाच्या अहवालामध्ये एका स्वतंत्र भागात, संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी पुरेसे कारण आहे किंवा नाही यासंबंधीचे सल्लागार मंडळाचे मत विनिर्दिष्ट करण्यात आलेले असेल.

(३) जेव्हा सल्लागार मंडळाच्या सदस्यांमध्ये मतभिन्नता असेल तेव्हा, अशा सदस्यांपैकी बहुसंख्य सदस्यांचे मत हे मंडळाचे मत असल्याचे मानण्यात येईल.

(४) ज्या व्यक्तीविरुद्ध स्थानबद्धता आदेश काढण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, सल्लागार मंडळाच्या निर्देशासंबंधातील कोणत्याही बाबतीत, कोणत्याही विधि-व्यवसायीद्वारे उपस्थित होण्यास हक्क मिळणार नाही आणि सल्लागार मंडळाची कार्यवाही व त्याचा अहवाल-अहवालाच्या ज्या भागात सल्लागार मंडळाचे मत विनिर्दिष्ट केलेले असेल तो भाग वगळून-गोपनीय असेल.

---

१. १९८१ चा अधिनियम १९, कलम २ द्वारे मूळ पोटकलमे (२), (३) व स्पष्टीकरण यांच्या ऐवजी घातले.

** महाराष्ट्र शासन राजपत्र, १२ नोव्हेंबर, १९८१ यात प्रसिद्ध झालेल्या १९८१ चा अधिनियम क्रमांक १९, कलम ३ द्वारे घालण्यात आला.

**सल्लागार मंडळाच्या अहवाला-वरील कार्यवाही.**

१२. (१) एखाद्या व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी आपल्या मते पुरेसे कारण असल्याचे सल्लागार मंडळाने नमूद केले असेल अशा कोणत्याही प्रकरणी, समुचित शासनाला स्थानबद्धता आदेश कायम करता येईल आणि त्याला योग्य वाटेल तितक्या कालावधीपर्यंत संबंधित व्यक्तीची स्थानबद्धता चालू ठेवता येईल.

(२) संबंधित व्यक्तीच्या स्थानबद्धतेसाठी आपल्या मते पुरेसे कारण नसल्याचे सल्लागार मंडळाने नमूद केले असेल अशा कोणत्याही बाबतीत, समुचित शासन स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करील आणि त्या व्यक्तीला तात्काळ मुक्त करवील.

**स्थानबद्धतेचा कमाल कालावधी.**

१३. कलम १२ अन्वये कायम केलेल्या कोणत्याही स्थानबद्धता आदेशान्वये कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध ठेवण्याचा कमाल कालावधी हा स्थानबद्धतेच्या दिनांकापासून सहा महिने इतका असेल :

परंतु, स्थानबद्धता आदेश त्या आधी कोणत्याही वेळी प्रत्याहृत करण्याच्या किंवा त्यात अपरिवर्तन करण्याच्या समुचित शासनाच्या शक्तीवर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

**स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत करणे.**

१४. (१) सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याच्या कलम २१ च्या उपबंधास बाध न आणता, एखादा स्थानबद्धता आदेश,—

(क) तो आदेश, राज्य शासनाच्या एखाद्या अधिकाऱ्याने, त्या राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने दिलेला असला तरीही,

(ख) तो केंद्र सरकारच्या अधिकाऱ्याने, किंवा एखाद्या राज्य शासनाने किंवा केंद्र सरकारने दिलेला असला तरीही,

—कोणत्याही वेळी प्रत्याहृत करता येईल किंवा त्यात आपरिवर्तन करता येईल.

(२) स्थानबद्धता आदेश प्रत्याहृत झाल्यामुळे किंवा त्याच्या समाप्तीमुळे, प्रत्याहरणाच्या किंवा समाप्तीच्या दिनांकानंतर, ज्यात अशी काही नवी तथ्ये उद्भवली असतील की, ज्यात केंद्र सरकार किंवा राज्य शासन, किंवा यथास्थिति एखादा अधिकारी यांची असा आदेश देण्यात यावा याविषयी खात्री पटली असेल, अशा कोणत्याही प्रकरणी त्याच व्यक्तीविरुद्ध कलम ३ अन्वये नवीन स्थानबद्धता आदेश देण्यात कोणतीही आडकाठी येणार नाही.

**स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीची तात्पुरती मुक्तता.**

१५. (१) एखाद्या स्थानबद्धता आदेशानुसार, स्थानबद्ध केलेल्या व्यक्तीला कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीपुरते, बिनशर्त किंवा निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या ज्या शर्ती त्या व्यक्तीने मान्य केलेल्या असतील त्या शर्तीवर मुक्त करावे असे समुचित शासनाला कोणत्याही वेळी निदेशित करता येईल आणि कोणत्याही वेळी त्याची मुक्तता रद्द करता येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये कोणत्याही व्यक्तीची मुक्तता निदेशित करताना, निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या शर्तीच्या यथोचित पालनासाठी त्या व्यक्तीस जामीनदारांसह किंवा त्याविना एक बंधपत्र करून देण्यासाठी समुचित शासनाला फर्मावता येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये मुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, तिची मुक्तता करण्याचा, किंवा यथास्थिति मुक्तता रद्द करण्याचा निदेश देणाऱ्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या ठिकाणी व वेळी, आणि त्या प्राधिकाऱ्याच्या स्वाधीन होईल.

(४) जर पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या या रीतीने, स्वतः स्वाधीन होण्यात कोणत्याही व्यक्तीने पुरेशा कारणाशिवाय कसूर केली तर, तिला दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

(५) जर पोटकलम (१) अन्वये मुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने, तिच्यावर उक्त पोटकलमान्वये लादलेल्या किंवा तिचे करून दिलेल्या बंधपत्रातील शर्तीची पूर्तता करण्यात कसूर केली तर, ते बंधपत्र समपहृत केल्याचे घोषित करण्यात येईल आणि त्याद्वारे बांधील असलेली कोणतीही व्यक्ती त्यातील शास्ती भरण्यास पात्र असेल.

**सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.**

१६. या अधिनियमानुसार सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करणे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीसाठी, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य विधिविषयक कार्यवाही आणि कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य विधिविषयक कार्यवाही करता येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

१७. (१) काळ्या बाजारास प्रतिबंध आणि अत्यावश्यक वस्तूंचा पुरवठा अध्यादेश, १९७९ (१९७९ चा १०) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा तऱ्हेने निरसन झाले असले तरीही, अशा तऱ्हेने निरसित झालेल्या अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कारवाई, या अधिनियमाच्या समनुरूप उपबंधान्वये केल्याचे समजण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई